# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक - १०३-२०२२/ सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम आपिलिय अधिकारी तथा |
|---|---|---|
| प्रभाकर उत्तम ढाकणेपाटील | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालय, बार्शी, ता.बार्शी, जि. सोलापूर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर |

(निर्णय दि. ५.२.२०२६ )

तक्रारदार यांनी दिनांक २०.०४.२०२२ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारी मध्ये तक्रारदार यांनी द्वितीय अपील क्रमांक :-५२०३-५२०४+५२०५-२०१६ या प्रकरणी माहिती पुरविण्याचे आदेश दिले आहेत तथापि ' जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण, दिशाभूल करणारी, चुकीची माहिती दिली आहे तरी संबंधितावर कारवाई करावी, अशी मागणी आयोगाकडे केली आहे.

उपरोक्त प्रकरणी आपिलार्थी यांनी यापूर्वी दि. १८.०२.२०१९ च्या अर्जान्वये कलम १८ अंतर्गत क्रमांक ६५-२०१९ अन्वये आयोगाचे आदेशानंतर अद्याप पर्यंत माहिती दिली नाही अशी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीवर आयोगाने दिनांक २१.१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन सुनावणी मध्ये तक्रारदार यांना माहिती प्राप्त झाल्याचा निष्कर्ष नोंदवून तक्रार निकाली काढण्याचे आदेश पारित केले आहेत.

तक्रारदार यांनी याच प्रकरणी आयोगाकडे पुनःश्च तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी यापूर्वी दाखल केलेल्या तक्रार प्रकरणी आयोगाने सुनावणी घेऊन अंतिम आदेश पारित केले असल्याने या तक्रार प्रकरणी पुढे कार्यवाही अपेक्षित नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. सदर प्रकरणी आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे.

तक्रार क्रमांक - १०३-२०२२ / सोलापूर जावक क्र. 654 दिनांक- 10/2/2026